महाविदर्भ 3

चंद्रपुर, शनिवार दि.३० मार्च २०१९

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने पारितोषिक वितरण समारंभ संपन्न



चंद्रपुर (का.प्र.)-

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित व संपन्न झालेल्या ११ व्या औद्योगिक व व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सव व ६६ वा राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सव दि. २७.३.२०१९ रोजी पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्रीपाद जोशी ज्येष्ठ लेखक, नाटककार, कवी व अभिनेता, प्रमुख पाहुणे मधुकर परचाके उपमुख्य अभियंता, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र चंद्रपूर, सुषमा साखरवाडे अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर हे कार्यक्रमाला उपस्थित होते. घनश्याम कुळमेथे सहाय्यक कल्याण आयुक्त, मुंबई यांनी प्रास्ताविक केले. आभार प्रदर्शन अरुण कापसे कामगार विकास अधिकारी, संचालन प्रतिभा भाकरे, कामगार कल्याण अधिकारी यांनी केले. याप्रसंगी मनोज बागले पी.आर.ओ.मुंबई, राजेश पाठराबे लेखा अधिकारी नागपूर हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात दिपप्रज्वलनाने झाली मंडळातर्फे पाहुण्यांचे शाल, श्रीफळ व गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात हा कार्यक्रम चंद्रपूर सारख्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात करण्यात आला. या बद्दल मंडळाचे त्यांनी रून व्यक्त केले. त्यांनी सांगितले की मंडळात सर्वप्रथम कामठी या केंद्रातुन नाटक सादर केले होते. आज या नाटकाच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून बोलवले या बद्दल त्यांना अतिशय भुषणावह वाटले. कामगार कल्याण केंद्र कामगारांसाठी अविरत प्रयत्न करते हे त्यांच्या भाषणातुन दिसुन आले. त्यानंतर ११ व्या औद्योगिक व व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सव व ६६ वा राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सव यातिल विजेता संघांना पारितोषिक देण्यात आले. वैयक्तिक बक्षीसे देण्यात आली. त्यानंतर नथिंग टु से या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता कांचन वणी, कामगार कल्याण अधिकारी, प्रतिभा पागधुने, इटनकर, सचिन वंजारी, सुधर्मा खोडे, हरीश शेंडे, मुकूंद पेंढारकर, अजय मोहोड, दौलत गोरे, पवार, वानखेडे, हेमंत जौंजाळ, सुरेश बेलसरे, बावणे, वानोडे, प्रशांत देशपांडे, कविता लोखंडे, किरण उपरे, समिक्षा सरुरकर, कविता कांबळे, स्थानिक सर्व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.(का)

देशोन्नती
नागपूर/ शनिवार, दि. ३० मार्च २०१९

# नवोदित कलाकार कलेचा वारसा पुढे नेत आहेत याचा अभिमान वाटतो : श्रीपाद जोशी

## 'नथिंग टू से' ने जिंकली सर्व रसिकांची मने

प्रतिनिधी /२९ मार्च

**चंद्रपूर :** ६६ वा राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सव व ११ व्या औद्योगिक व व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सव २०१८-१९ पारितोषिक वितरण समारंभ महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ तर्फे ज्येष्ठ लेखक, अभिनेता, नाटक्कार कवी श्रीपाद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहातं पार पडला.

या पारितोषिक वितरण समारंभात अकराव्या औद्योगिक व व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सवचे प्रथम पारितोषिक 'मिशन ५९' सादरकर्ते माझगाव डॉक स्पोटर्स क्लब मुंबई यांना तर द्वितीय पारितोषिक म.रा.वितरण कंपनी मर्यादित, भांडुप यांना तसेच तृतीय पारितोषिक '...रु मेट' नाटकाचे सादरकर्ते अमॅच्युअर थेटर रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे, रायगड यांना प्रदान करण्यात आले. त्याचसोबत ६६ व्या राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सवचे प्रथम पारितोषिक ललित कला भवन बंगाली कॅम्प चंद्रपूर यांनी सादर केलेल्या 'नथिंग टू से' या नाटकाला तसेच द्वितीय पारितोषिक का. क. केंद्र नेहरूनगर नाशिक यांच्या 'डोंगरार्त' या नाटकाला मिळाले. तर तृतीय पारितोषिक 'मोमोज' नाटकाचे सादरकर्ते का. क. केंद्र शेगाव नाका अमरावती यांना प्रदान करण्यात आले. ११ वा औद्योगिक व व्यावसायिक कामगार महोत्सवातून उत्कृष्ट अभिनय पुरुष तुषार पुरूषोत्तम, उत्कृष्ट अभिनय महिला प्रियांका कासले, उत्कृष्ट दिग्दर्शन तुषार घरत, उत्कृष्ट नेपथ्य महेश केरकर, उत्कृष्ट पार्श्वसंगीत आकाश तंबूटकार, उत्कृष्ट प्रकाशयोजना संदीप साटम, उत्कृष्ट नाट्यलेखन प्रकाश माजलकर यांनाही वैयक्तिक पारितोषिक प्रदान करण्यात आले.

तसेच ६६ व्या राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सव स्पर्धेत उत्कृष्ट अभिनय पुरुष तुषार सौरभ काळपांडे, उत्कृष्ट अभिनय महिला बकुळ धवणे, उत्कृष्ट दिग्दर्शन जयश्री कापसे, उत्कृष्ट नेपथ्य पंकज नवघरे, उत्कृष्ट पार्श्वसंगीत अजय इंगळे, उत्कृष्ट प्रकाशयोजना हेमंत गुहे यांनाही प्रथम पारितोषिक श्रीपाद जोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी रसिकांना संबोधित करताना श्रीपाद जोशी म्हणाले की, कोणतीही चळवळ एका दिवसात उभी राहत नसून यासाठी अनेक पिढ्यांना प्रयत्न करावे लागतात. चंद्रपूर जिल्ह्याचे नाट्य क्षेत्रात मोठे योगदान आहे. मी सातवीत असताना मंडळाच्या नाट्यस्पर्धेतून पहिल्यांदा या क्षेत्रात आलो. त्यामुळेच मी १४ नाटके लिहू शकलो. आता नवीन पिढीतील बकुल धवणे सारखे नवोदित कलाकार हा वारसा पुढे नेत आहेत याचा अभिमान वाटतो. प्रथम पारितोषिक विजेते ललित कला भवन बंगाली कॅम्प चंद्रपूर तर्फे नथिंग टू से या नाटकाचा नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. उत्कृष्ट कथा आणि अभिनय असलेल्या या नाटकाने सर्व रसिकांची मने जिंकली. या समारंभात सहा.कामगार आयुक्त उज्वल लोया, उपमुख्य अभियंता मधुकर परचाके, अधीक्षक अभियंता सुषमा साखरवाडे उपस्थित होते.

पुण्य नगरी
शनिवार, ३० मार्च २०१९। चंद्रपूर

# 'नथिंग टू से'ने जिंकली रसिकांची मने



**चंद्रपूर :** ६६ वा राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सव व ११ व्या औद्योगिक व व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सव २०१८-१९ पारितोषिक वितरण समारंभ महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे २७ मार्च रोजी ज्येष्ठ लेखक, अभिनेता, नाटककार, कवी श्रीपाद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात पार पडला.

या पारितोषिक वितरण समारंभात अकराव्या औद्योगिक व व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सवाचे प्रथम पारितोषिक 'मिशन ५९' सादरकर्ते माझगाव डॉक स्पोर्ट्स क्लब मुंबई यांना तर द्वितीय पारितोषिक म.रा. वितरण कंपनी मर्यादित, भांडूप यांना तसेच तृतीय पारितोषिक 'स्टेल मेट' नाटकाचे सादरकर्ते अॅम्युअर थेटर रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागठाणे, रायगड यांना प्रदान करण्यात आले. त्याचसोबत ६६ व्या राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सवाचे प्रथम पारितोषिक ललित कला भवन बंगाली कॅम्प चंद्रपूर यांनी सादर केलेल्या 'नथिंग टू से' या नाटकाला तसेच द्वितीय पारितोषिक कामगार कल्याण केंद्र नेहरूनगर नाशिक यांच्या 'डोंगरार्त' या नाटकाला मिळाले. तर तृतीय पारितोषिक 'मोमोज' नाटकाचे सदरकर्ते कामगार कल्याण केंद्र शेगाव नाका अमरावती यांना प्रदान करण्यात आले.

११ वा औद्योगिक व व्यावसायिक कामगार महोत्सवातून उत्कृष्ट अभिनय पुरुष तुषार पुरुषोत्तम, उत्कृष्ट अभिनय महिला प्रियांका कासले, उत्कृष्ट दिग्दर्शन तुषार घरत, उत्कृष्ट नेपथ्य महेश केरकर, उत्कृष्ट पार्श्वसंगीत आकाश तंबुटकार, उत्कृष्ट प्रकाशयोजना संदीप साटम, उत्कृष्ट नाट्यलेखन प्रकाश माजलकर यांनाही वैयक्तिक पारितोषिक प्रदान करण्यात आले. तसेच ६६ व्या राज्यस्तरीश कामगार नाट्य महोत्सव स्पर्धेत उत्कृष्ट अभिनय पुरुष तुषार काळपांडे, उत्कृष्ट अभिनय महिला बकुळ धवणे, उत्कृष्ट दिग्दर्शन जयश्री कापसे, उत्कृष्ट नेपथ्य पंकज नवघरे, उत्कृष्ट पार्श्वसंगीत अजय इंगळे, उत्कृष्ट प्रकाशयोजना हेमंत गुहे यांनाही प्रथम पारितोषिक श्रीपाद जोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी रसिकांना संबोधित करताना श्रीपाद जोशी म्हणाले, कोणतीही चळवळ एका दिवसात उभी राहत नसून, यासाठी अनेक पिढ्यांना प्रयत्न करावे लागतात. चंद्रपूर जिल्ह्याचे नाट्य क्षेत्रात मोठे योगदान आहे. मी सातवीत असताना मंडळाच्या नाट्यस्पर्धेतून पहिल्यांदा या क्षेत्रात आलो. त्यामुळेच मी १४ नाटके लिहू शकलो. आता नवीन पिढीतील बकुळ धवणे सारखे नवोदित कलाकार हा वारसा पुढे नेत आहेत याचा अभिमान वाटतो, असेही जोशी म्हणाले.

प्रथम पारितोषिक विजेते ललित कला भवन बंगाली कॅम्प चंद्रपूर तर्फे नथिंग टू से या नाटकाचा नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. उत्कृष्ट कथा आणि अभिनय असलेल्या या नाटकाने सर्व रसिकांची मने जिंकली. या समारंभात सहाय्यक कामगार आयुक्त उज्वल लोया, उपमुख्य अभियंता मधुकर परचाके, अधीक्षक अभियंता सुषमा साखरवाडे व इतर कर्मचारी वर्गासोबतच कामगार बांधव, नाट्यकलावंत आणि नाट्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ | चंद्रपूर
TODAY
शनिवार, ३० मार्च २०१९

# 'नथिंग टू से'ने जिंकली रसिकांची मने

सकाळ वृत्तसेवा

चंद्रपूर, ता. २९ : ६६ वा राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सव व ११ व्या औद्योगिक व व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सव २०१८-१९ पारितोषिक वितरण समारंभ प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सभागृहात पार पडला.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे २७ मार्चला आयोजित या महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखक, अभिनेता, नाटककार, कवी श्रीपाद जोशी होते. यावेळी सहायक कामगार आयुक्त उज्ज्वल लोया, उपमुख्य अभियंता मधुकर परचाके, अधीक्षक अभियंता सुषमा साखरवाडे उपस्थित होते.

अकराव्या औद्योगिक व व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सवाचे प्रथम पारितोषिक मिशन ५९ सादरकर्ते माझगाव डॉक स्पोर्ट्स क्लब मुंबई यांना, द्वितीय पारितोषिक म. रा. वितरण कंपनी मर्यादित. भांडूप यांना, तृतीय पारितोषिक स्टेल मेट नाटकाचे सादरकर्ते अमॅच्युअर थेटर रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे, रायगड यांना प्रदान करण्यात आला. ६६ व्या राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सवाचे प्रथम पारितोषिक ललित कला भवन बंगाली कॅम्प चंद्रपूर यांनी सादर केलेल्या नथिंग टू से या नाटकाला, द्वितीय पारितोषिक का. क. केंद्र नेहरूनगर नाशिक यांच्या डोंगरात या नाटकाला, तर तृतीय पारितोषिक मोमोज नाटकाचे सादरकर्ते का. क. केंद्र शेगाव नाका अमरावती यांना प्रदान करण्यात आले.

११ वा औद्योगिक व व्यावसायिक कामगार महोत्सवातून उत्कृष्ट अभिनय पुरुष गट तुषार पुरुषोत्तम, उत्कृष्ट अभिनय महिला गट प्रियांका कासले, उत्कृष्ट दिग्दर्शन तुषार घरत, उत्कृष्ट नेपथ्य महेश केरकर, उत्कृष्ट पार्श्वसंगीत आकाश तंबुटकार, उत्कृष्ट प्रकाशयोजना संदीप साटम, उत्कृष्ट नाट्यलेखन प्रकाश माजलकर, तसेच ६६ व्या राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सव स्पर्धेत उत्कृष्ट अभिनय पुरुष तुषार सौरभ काळपांडे, उत्कृष्ट अभिनय महिला बकुळ धवने, उत्कृष्ट दिग्दर्शन जयश्री कापसे, उत्कृष्ट नेपथ्य पंकज नवघरे, उत्कृष्ट पार्श्वसंगीत अजय इंगळे, उत्कृष्ट प्रकाशयोजना हेमंत गुहे यांना प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले. प्रथम पारितोषिक विजेते नथिंग टू से या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला.

> कोणतीही चळवळ एका दिवसात उभी राहत नाही. यासाठी अनेक पिढ्यांना प्रयत्न करावे लागतात. चंद्रपूर जिल्ह्याचे नाट्य क्षेत्रात मोठे योगदान आहे. जिल्ह्याचा वारसा नवोदित कलाकार पुढे नेत असल्याचा अभिमान वाटतो.
> – श्रीपाद जोशी, लेखक, चंद्रपूर



चंद्रपूर : महिला गटातून उत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार स्वीकारताना बकुळ धवने.

लोकमत मंगळवार, दि. २६ मार्च २०१९

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे पारितोषित वितरण

लोकमत न्यूज़ नेटवर्क

**चंद्रपूर :** ६६ वा राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सव व ११ वा औद्योगिक व व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सव २०१८-१९ चे पारितोषिक वितरण समारंभ २७ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता येथील प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखक, नाटककार श्रीपाद जोशी, प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक कामगार आयुक्त उज्ज्वल लोया, चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता मधुकर परचाके, अधिक्षक अभियंता सुषमा साखरवाडे आदींची उपस्थिती राहणार आहे.

समारंभानंतर नथिंग टु से नाट्यप्रयोग होणार आहे, अशी माहिती प्र कल्याण आयुक्त महेंद्र तायडे, मंडळाचे सहाय्यक कल्याण आयुक्त घनश्याम कुळमेथे, नागपूर विभागाचे सहाय्यक कल्याण आयुक्त सतीश दाभाडे यांच्यासह आयोजकांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे.

देशोन्नती
मंगळवार, दि. २६ मार्च २०१९
epaper.deshonnati.com

# उद्या राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा

प्रतिनिधी /२५ मार्च

**चंद्रपूर :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे वतीने आयोजीत सन २०१८-१९ मध्ये यशस्वीरित्या संपन्न झालेल्या ११ वा औद्योगिक व व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाटय महोत्सव व ६६ वा राज्यस्तरीय कामगार नाटय महोत्सव २०१८ - १९ या दोन्ही महोत्सवातील विजेत्या संघाचा /कलावंताचा पारितोषीक वितरण समारंभ दि. २७ मार्च २०१९ रोजी सायं. ५ वाजता प्रियदर्शनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह, चंद्रपूर येथे नाटयकलाकार कवी व अभिनेता श्रीपाद जोशी यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आलेला आहे.

यावेळी चंद्रपूरचे सहाय्यक कामगार आयुक्त उज्वल लोया तथा चंद्रपूरचे महाऔष्णीक विद्युत केंद्र चंद्रपूर चे उपमुख्य अभियंता मधुकर परचाके हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित राहणार असुन सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूरच्या अधिक्षक अभियंता सुषमा साखरवाडे तथा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे प्र. कल्याण आयुक्त महेंद्र तायडे व मंडळाचे सहाय्यक कल्याण आयुक्त घनशाम कुळमेथे व नागपूर विभागाचे सहाय्यक कल्याण आयुक्त सतिश दाभाडे यांनी यावेळी विशेष उपस्थिती राहणार आहे.

विजयी संघांना उपस्थित मान्यवरांचे हस्ते पारितोषीक प्रदान करण्यात येणार असून यावेळी उत्कृष्ट अभिनय पुरूष, अभिनव महिला, उत्कृष्ट दिग्दर्शन उत्कृष्ट नेपथ्य, उत्कृष्ट पाशर्वनगीत, उत्कृष्ट प्रकाश योजना व उत्कष्ट नाटय लेखन याही पारितोषीकांचा यात समावेश आहे.

पारितोषीक वितरण समारंभ प्रसंगी मंडळाच्या ६६ व्या राज्यस्तरीय कामगार नाटय महोत्सव स्पर्धेत शाम पारितोषीक विजेते ललित कला भजन, बंगाली कॅम्प, चंद्रपूर तर्फे नथिंग टु से या नाटकाचा नाटयप्रयोग सायं. ७ या सादर करण्यात येणार आहे. तरी कामगार बांधव तथा नाटय कलावंत, नाटयरसिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन चंद्रपूर च्या कामगार कल्याण अधिकारी कांचन वाणी यांनी केले आहे.

पुण्य नगरी
मंगळवार, २६ मार्च २०१९ । चंद्रपूर

# ६६ व्या राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा चंद्रपुरात उद्या

## राज्यात प्रथम आलेल्या 'नथिंग टू से' या नाटकाचे सादरीकरण होणार

**चंद्रपूर** : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाद्वारे आयोजित ६६ वा राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सव व ११ वा औद्योगिक व व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा २७ मार्च रोजी जागतिक रंगभूमीदिनी प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सभागृह चंद्रपूर येथे होणार आहे. ६६ व्या कामगार राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत यंदा चंद्रपूरचे प्रसाद दाणी लिखित डॉ. जयश्री कापसे-गावंडे दिग्दर्शित 'नथिंग टू से' हे नाटक राज्यातून प्रथम आले आहे. या पारितोषिक वितरण सोहळ्यानंतर 'नथिंग टू से' या नाटकाचा प्रयोग सादर होणार आहे.

सायंकाळी ५ ते ७ दरम्यान आयोजित या पारितोषिक वितरण सोहळ्याला चंद्रपूरचे साहाय्यक कामगार आयुक्त उज्ज्वल लोया, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे उपमुख्य अभियंता मधुकर परचाके, सार्वजनिक बांधकाम मंडळाच्या अधीक्षक अभियंता सुषमा साखरवाडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ रंगकर्मी श्रीपाद जोशी राहतील.पारितोषिक वितरण सोहळ्यानंतर सायंकाळी ७ वाजता कामगार कल्याण केंद्र ललित कला भवन चंद्रपूर अर्थात नवोदिता चंद्रपूर निर्मित राज्यातून प्रथम आलेल्या 'नथिंग टू से' या नाटकाचा प्रयोग सादर होणार आहे. या नाटकाचे निर्माते अजय धवने, आशिष अंबाडे असून, दिग्दर्शक डॉ. जयश्री कापसे-गावंडे या आहे. प्रकाश योजना हेमंत गुहे यांची असून, नेपथ्य पंकज नवघरे, तेजराज चिकटवार यांचे आहे. संगीत प्रताप सोनाळे यांचे असून, संगित सहाय्य अंकुश राजुरकर यांचे आहे. रंगभूषा आणि वेशभूषेची जबाबदारी नूतन धवने यांनी सांभाळली आहे. या नाटकात जयंत वंजारी, राजेंद्र तुपे आणि बकूळ धवने यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

नाट्यप्रयोग रसिक प्रेक्षकांसाठी निःशुल्क आहे.या पारितोषिक वितरण सोहळ्याला तसेच 'नथिंग टू से' या नाट्य प्रयोगाला चंद्रपूरकर नाट्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे करण्यात आले आहे.

सकाळ | चंद्रपूर
मंगळवार, २६ मार्च २०१९
TODAY

## नाट्य महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा बुधवारी

चंद्रपूर, ता. २५ : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या औद्योगिक, व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सव, ६६ वा राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सवाचा बक्षीस वितरण सोहळा येत्या २७ मार्च रोजी प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात होत आहे.

नाटककार, कवी श्रीपाद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्याला सहायक आयुक्त उज्वल लोया, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे उपमुख्य अभियंता मधुकर परचाके, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता सुषमा साखरवाडे, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे प्रभारी कल्याण आयुक्त महेंद्र तायडे, घनश्याम कुळमेथे, नागपूर विभागाचे सहायक कल्याण आयुक्त सतीश दाभाडे यांची उपस्थिती राहील. ११ वा औद्योगिक, व्यावसायिक कामगार राज्यस्तरीय नाट्य महोत्सवात प्रथम क्रमांक माझगांव डॉक स्पोर्ट्स क्लब मुंबई आयोजित मिशन ५९ या नाटकाला मिळाले. द्वितीय क्रमांक ती रात्र, तृतीय क्रमांक स्टेलमेंट, उत्तेजनार्थ आयुष्य साधताना या नाटका मिळाले. ६६ वा राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सवात प्रथम क्रमांक नथिंग टू. से, द्वितीय क्रमांक डोंगरार्त, तृतीय क्रमांक मोमोज तर उत्तेजनार्थ बक्षीस खिडक्या या नाटकाला मिळाले. विजयी संघांना उपस्थित मान्यवरांचे हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे.